**महाराष्ट्र शासन**

**समाजकल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१**
**दूरध्वनी क्र. (विजाभज) ०२०-२६०५१८१४ (अनु. जाती) ०२०-२६१३७१८६**

# राज्यातील अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जाहीर आवाहन

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाच्या सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी डीबीटी (Mahadbt) पोर्टल दिनांक १/१०/२०१८ पासून नव्याने कार्यान्वित झाली असून https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळाचा वापर करून अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता सामाजिक न्याय विभाग व विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती/फ्रीशिप योजनांकरिता आपले ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत केले आहेत. सदर अर्ज आपल्या संबंधित महाविद्यालयाकडून तपासून व पडताळणी करून आपल्या जिल्ह्यातील सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग यांचेकडे मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहेत. महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या अर्जांवर आपल्या जिल्ह्यातील सहायक आयुक्त, समाजकल्याण यांचेकडून ऑनलाईन मान्यता देण्यात येत आहेत. सदर पोर्टलवर मान्य झालेले अर्जांची अदायगीची प्रक्रिया यशस्वी होणेकरिता खालील बाबींची **विद्यार्थ्यांच्या लॉगीनमधून ऑनलाईन पूर्तता होणे अत्यावश्यक आहे.**

**१) प्रणालीमधील "पेमेंट व्हाऊचर" (Payment Voucher Details) या स्क्रीनवरील "इन्स्टिट्यूट स्टेटस" (Institute Status) व "स्टुडंट स्टेटस" (Student Status) हे पहिल्या (First Installment) सत्राकरिता "approved" म्हणजेच मान्यता दर्शविली असल्यास आपणास "Redeem" हे बटण सक्रिय/ॲक्टिव झालेले दिसेल.**

**२) वरील स्क्रीनमध्ये विद्यार्थी व महाविद्यालय यांना मान्य झालेल्या रकमा दर्शवण्यात येत आहेत. सदर रकमा या संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर, तसेच संबंधित महाविद्यालयाच्या बँक खात्यावर वितरीत करून घ्यावयाच्या असल्यास "Redeem" बटण दाबणे अत्यावश्यक आहे.** या प्रक्रियेस ''व्हाऊचर जनरेशन (Voucher Generation) '' असे संबोधित केले जाते.

**३) विद्यार्थ्यांच्या लॉगीनमधून उपरोक्त १ व २ मध्ये नमूद केलेली ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण न केल्यास मान्य झालेली विद्यार्थी व महाविद्यालयाची शिष्यवृत्तीची रक्कम वितरण होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

४) विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक प्रणालीमध्ये अचूक नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

५) नोंदणीकृत केलेले बँक खाते क्रमांक आपल्या आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.

६) अदायगीच्या प्रक्रियेमध्ये प्रत्येक स्तरावर एस. एम. एस. येणेस्तव मोबाईल क्रमांक हा आधार तसेच नोंदणीकृत बँक खात्याशी संलग्न असून तो अद्ययावत असणे आवश्यक आहे.

सद्यःस्थितीत असे निदर्शनास येत आहे, की व्हाऊचर जनरेशन (Voucher Generation) झालेल्या अर्जसंख्येपैकी केवळ १०% विद्यार्थ्यांनी व्हाऊचर रिडीमशन (Voucher Redemption) प्रक्रिया पूर्ण केलेली असून ९०% विद्यार्थ्यांनी व्हाऊचर रिडीमशन प्रक्रिया अद्यापही केलेली नाही. सदर प्रक्रिया विद्यार्थ्यांमार्फत पूर्ण होत नसल्याने विद्यार्थ्यांचे व संबंधित महाविद्यालयाचे शिष्यवृत्तीच्या रकमेचे वितरण पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

याअनुषंगाने आपणास आवाहन करण्यात येते, की उपरोक्त सूचनांमधील क्रमांक १, २ व ३ या प्रक्रिया विद्यार्थ्यांच्या लॉगीनमधूनच पूर्ण करून घेणे अत्यावश्यक आहेत. तसेच क्रमांक ४, ५ व ६ या बाबीदेखील परिपूर्ण नसल्यास त्या त्वरित करून घेण्यात याव्यात.

उपरोक्त दिलेल्या सूचनांचे पालन न केल्यास व शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयाच्या बँक खात्यावर न जमा झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी संबंधित विद्यार्थ्यांची असेल व याबाबत सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी राहणार नाही, याची सर्व विद्यार्थ्यांनी कृपया दखल घ्यावी.

**महाविद्यालयांसाठी विशेष सूचना**

- आपल्या महाविद्यालयातील / विद्यापीठातील विद्यार्थी प्रतिनिधी (UR, GS, SR) यांना आपल्या स्तरावरून उपरोक्त सूचना विविध माध्यमातून विद्यार्थ्यांना त्वरेने कळविण्याचे आवाहन करावेत.
- आपल्या स्तरावरून सदर 'जाहीर आवाहन' महाविद्यालयाच्या मुख्य सूचनाफलक, तसेच आवश्यकता असल्यास परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध करण्यात यावेत.

**शरद अहिरे** (भा. प्र. से.)
संचालक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

**मिलिंद शंभरकर** (भा. प्र. से.)
आयुक्त, समाजकल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

**डी. जी. आय. पी. आर. २०१८/२०१९/६०६२**